# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४५** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- ३४७** **दिनांक :- १२/१२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१३/११/२०२५ गुरुवार रोजी दुपारी ४.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४४ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१३/११/२०२५ गुरुवार रोजी दुपारी ४.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४४ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१३/११/२०२५ गुरुवार रोजी दुपारी ४.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४४ तसेच दि.१२/१२/२०२५ शुक्रवार रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४५ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड  नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४५** **(महासभा)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र :-३४८** **दिनांक :- १२/१२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रशासन अधिकारी,शिक्षण विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मनपाशिमं/२०२५-२६/४१७ दि.२६/११/२०२५
३. प्रशासन अधिकारी, मनपा,शिक्षण विभाग यांचा अभिप्राय.
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०६/११/२०२५ चा अभिप्राय.
५. आयुक्त यांचा दि.१७/११/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** सलमा मिर मुश्ताक अली, उपशिक्षिका, म.न.पा. उर्दू शाळा क्रं.१५, शिवाजी नगर, जळगांव यांच्या एकतर्फी आंतरजिल्हा बदलीस नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगाव महानगरपालिका शिक्षण विभाग, जळगाव आस्थापनेवरील कार्यरत सलमा मिर मुश्ताक अली, उपशिक्षिका मनपा उर्दू शाळा क्र. १५, जळगाव या शाळेत दि.१९/०९/२०१९ पासून सेवेत कार्यरत आहे. त्यांचे मुळगाव छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असून त्यांचे वडीलांचे निधनानंतर त्यांची वयोवृध्द आई सतत आजारी असल्याने त्यांची देखभाल करणेसाठी छत्रपती संभाजीनगर येथे राहणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे मुळगाव छत्रपती संभाजीनगर ते जळगाव शहरापासूनचे अंतर १५० किलोमीटर आहे. म्हणून संबंधीतांनी महानगरपालिका शिक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर या आस्थापनेवर एकतर्फी जिल्हा बदली होणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकरीता दि. ३०/१२/२०२४ रोजी प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

तथापि, शासन निर्णय दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ अन्वये संबंधीतानी नियमानुसार प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे जिल्हा बदलीसाठी परिपूर्ण विनंती अर्जासह प्रस्ताव सादर केलेला असून उक्त शासन निर्णयात दिलेल्या १ ते ११ अटी व शर्ती मान्य असलेबाबत प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. तसेच त्यांना शासन निर्णयानुसार नियुक्ती प्राधिकाऱ्याचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.

तथापि, पवित्र पोर्टल प्रणालीवरती १४ उर्दू शिक्षणसेवकांची मागणी नोंदविण्यात आलेली होती. त्यापैकी पहिल्या फेरीत ०५ शिक्षणसेवक रुजू झालेले असून दुसऱ्या फेरीत ०६ शिक्षणसेवक रुजू झालेले आहेत. तसेच पवित्र पोर्टल प्रणालीवर मागणी नोंदविण्यात आलेली होती त्यानुसार पवित्र पोर्टल व्दारे मनपा शिक्षण विभाग,जळगांव येथे नविन ०३ शिक्षणसेवक प्राप्त झालेले आहेत. तसेच जिल्हा बदलीने जाणारे शिक्षक हे कायम असून त्यांना पुर्णवेतन अदा केले जाते. तसेच पवित्र प्रणालीव्दारे प्राप्त नविन शिक्षणसेवक यांना मानधन रु. १६०००/- मात्र असेल. त्यामुळे त्यांचा महापालिकेवरील ५० टक्के वेतनाचा आर्थिक बोजा ही कमी होईल.

तसेच संदर्भीय शासन निर्णयात दिलेनुसार सेवा वर्ग करण्याबाबत मान्यता देण्याचे अधिकार हे आयुक्त, महानगरपालिका यांना आहे. तरी संबंधीत उपशिक्षिका सलमा मिर मुश्ताक अली यांना छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभाग या आस्थापनेवर सामावून घेणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र मिळत नाही व या आस्थापनेवरुन आयुक्त, मनपा, जळगाव कार्यमुक्त करीत नाही तो पर्यंत संबंधीत उपशिक्षिका या याच शिक्षण विभाग जळगाव आस्थापनेवर कार्यरत राहतील, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

तरी सलमा मिर मुश्ताक अली, उपशिक्षिका म.न.पा. उर्दू शाळा क. १५, जळगाव यांना महानगरपालिका शिक्षण विभाग जळगावचे आस्थापनेवरुन महानगरपालिका शिक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर या आस्थापनेवर एकतर्फी जिल्हा बदली करणेसाठी त्यांना नाहरकत प्रमाणपत्र देणेस व सदर एकतर्फी जिल्हा बदलीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी प्रशासन अधिकारी,शिक्षण विभाग  यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४५** **(महासभा)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र :-३४९** **दिनांक :- १२/१२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आस्था/१४८/२०२५-२६ दि.१२/१२/२०२५
३. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.०२/१२/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०२/१२/२०२५ चा अभिप्राय
५. उपायुक्त यांचा दि.०४/१२/२०२५ चाअभिप्राय.
६. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०९/१२/२०२५ चा अभिप्राय.
७. आयुक्त यांचा दि.१०/१२/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील विविध कारणांनी रिक्त असलेल्या पदांमधून तसे आकृतिबंधानुसार मंजुर होऊन आलेल्या सफाई कामगार व मेलेली जनावरे उचलणारे कामगार अशी एकूण ३० रिक्त पदे भरणेबाबत.

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शासन निर्णय क्रमांक जमपा-२०२०/प्र.क्र.१८४/नवि-२५ दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ अन्वये सफाई कामगार (पुरुष/ स्त्री) नवनिर्मीत २६ पदे व मेलेली जनावरे उचलणारे नवनिर्मीत ०४ पदे अशी एकूण ३० पदे मंजुर करण्यांत आलेली आहेत.

सदर सफाई कामगारांची रिक्त पदे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) नुसार भरणे आवश्यक असुन शहराच्या स्वच्छतेकामी येत असलेल्या अडचणी काही प्रमाणात दूर होऊ शकतात. त्या अनुषंगाने आजमितीस सरळसेवेने / पदभरतीने सफाई कामगारांची नियुक्ती करावयाची झाल्यास प्रती सफाई कामगार चतुर्थ श्रेणीतील वेतन खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | मुळ वेतन | घरभाडे | महागाई भत्ता | वाहन भत्ता | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| सफाई कामगार | १५००० | १५०० | ८२५० | ६७५ | २४७५० |
| मेलेले जनावरे उचलणारे कामगार | १५००० | १५०० | ८२५० | ६७५ | २४७५० |

प्रती कामगार रु.२४७५०/- एकुण ३० कामगार = प्रति महिना रु.७,४२,५००/- असे एकुण प्रति वर्षाकरीता रु.८९,१०,०००/- इतका वार्षिक वेतनावर खर्च अपेक्षीत राहील तसेच सदर सफाई कामगारांना नियमानुसार वेतनवाढी रजा व इतर अनुषंगिक लाभ देय राहील व त्यावरील खर्चात वेळोवेळी वाढ होत राहील. त्या अनुषंगाने म.मुख्य लेखा अधिकारी यांचेकडुन अभिप्राय घेतले असता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील आस्थापना खर्च तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचे उपदान, अर्जित रजा इ. पोटीचे दायित्व देय असल्याचे नमूद केलेले आहे.

सदरची ३० सफाई कामगार पदाकरीता वेतनावर होणाऱ्या खर्चाकामी सफाई कामगारांच्या विविध कारणानी कायमस्वरुपी रिक्त असलेल्या पदांच्या वेतनासाठी वार्षिक तरतूद करणेत आलेली असुन सदरच्या तरतुदीमधून उक्त रक्कमेचा खर्च भागविता येईल. सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. आस्थापना खर्च ३५% चे आत असल्याबाबत खात्री करुन सदर सफाई कामगारांची पदभरती करणेत यावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४५** **(महासभा)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र :-३५०** **दिनांक :-१२/१२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रमुख वैद्यकीय अधिकारी, दवाखाना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./दवा./१०२२/२०२५-२६ दि.१२/१२/२०२५
३. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१२/१२/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.१२/१२/२०२५ चाअभिप्राय.
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१२/१२/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१२/१२/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिके अंतर्गत RC Phase-२ अंतर्गत कंत्राटी वैद्यकिय अधिकारी व परिचारिका यांना तात्पुरत्या करार स्वरुपात पुन:नियुक्ती आदेश देण्याबाबत.

वाचा क्र.१ व प्रमुख वैद्यकीय अधिकारी, दवाखाना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव अंतर्गत मनपा एकात्मिक आरोग्य कुटुंब सोसायटी (RCH Phase - २) अंतर्गत चार वैद्यकीय अधिकारी हे २०१० पासुन तसेच एक परिचारीका २००८ पासुन कार्यरत आहे. महासभा ठराव क्र. ५६ दि. २८/११/२००७ अन्वये सदर RCH Phase – २ योजना राबविण्यात करीता सदर वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांचे पदे भरण्यास व सदर पदावरील वेतनापोटी सन २००८-०९ मध्ये ५०% सन २००९-१० मध्ये ७५% व एप्रिल २०१० नंतर वेतनावर होणारा संपूर्ण खर्च महानगरपालिका निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच RCH Phase – २ अंतर्गत वैद्यकीय अधिकारी यांना पत्र क्र./रापुका/अर्बन/RCH/कक्ष १७/१६७३५-३७/०६/दि. १४/०३/२००६ अन्वये मंजूर पत्रानुसार दै. लोकमत दि.२३/१०/२०१० चे जाहीर प्रसिद्धीनुसार सदरची पदे भरण्यात आलेली आहे. तदनंतर दरवर्षी सदर वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांना एक दिवसाचा खंड देऊन पुर्न:नियुक्ती आदेश देण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने प्रशासक ठराव क्र.२०७ दि.०९/१२/२०२४ अन्वये सदर अधिकारी व कर्मचारी यांना दि.०२/०१/२०२५ ते दि. ३१/१२/२०२५ देण्यात आलेली होती. परंतू सदरच्या कालावधीचा करार दि.३१/१२/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने वर नमुद कर्मचारी यांनी त्यांची पुढील पुर्न:नियुक्ती मिळणेबाबत इकडील कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी वर नमुद कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत:-

| अ. क्र | कर्मचा-यांचे नांव | कार्यरत असलेल्या हेल्थपोस्ट व दवाखान्याचे नांव |
|---|---|---|
| १ | डॉ. पल्लवी प्रभाकर नारखेडे, वैद्यकीय अधिकारी | शाहीर अमर शेख दवाखाना, सुभाष चौक हेल्थ पोस्ट |
| २ | डॉ. पल्लवी किसनराव पाटील, वैद्यकीय अधिकारी | म.मो. मुलतानी दवाखाना, मेहरुण गावठाण हेल्थ पोस्ट |
| ३ | डॉ. सोनल गिरीष जोशी, वैद्यकीय अधिकारी | नानीबाई अग्रवाल दवाखाना, इंडिया गॅरेज, हेल्थ पोस्ट |
| ४ | डॉ. सायली चंद्रकांत पवार, वैद्यकीय अधिकारी | शिवाजी नगर हेल्थ पोस्ट |
| ५ | योगिता बबन बाविस्कर, परिचारीका | पिंप्राळा हुडको दवाखाना पिंप्राळा हेल्थ पोस्ट |

वर नमुद तक्तांतील १ ते ५ कर्मचारी हे त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी कार्यरत असुन त्याठिकाणी OPD, गरोदर माता (ANC) यांची दैनंदिन तपासणी तसेच वेळोवेळी राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यात येत असतात. उदा. नियमित लसीकरण, वार्षिक लसीकरण मोहिम, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व योजना, मिशन इंद्रधनुष्य यासारखे कार्यक्रमांसाठी सदर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी हे आपली नित्य सेवा देत असतात.

वैद्यकीय अधिकारी यांना दरमहा रु.४६,२१४/- व परिचारीका यांना रु. १४,१२१/- असे वेतन दरमहा मिळत आहे. सदर अधिकारी कर्मचारी यांना कोणताही भत्ता, एनपीए, टीएडीए, घरभाडे तसेच भविष्य निर्वाह निधी इ. लाभ दिला जात नाही. तरी चार वैद्यकीय अधिकारी व एक परिचारीका यांनी सन २०२६ साठी २०% पगार वाढ देणेबाबतची विनंती केली आहे.

उपरोक्त RCH Phase – २ चार वैद्यकीय अधिकारी व एक परिचारीका यांचा करार दि. ३१/१२/२०२५ रोजी संपुष्टात येत असुन त्यांना दि.०१/०१/२०२६ रोजी एक दिवसांचा खंड देऊन दि.०२/०१/२०२६ ते दि. ३१/१२/२०२६ या कालावधीसाठी मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता मागील प्रमाणे एकत्रित मानधन देणेस तसेच पुर्न:नियुक्ती देणे आवश्यक आहे.

सदरचा खर्च RCH कर्मचारी वेतन मनपा हिस्सा या लेखा शिर्षाखाली करण्यात येईल. या लेखाशिर्षावर सन २०२५-२६ या वर्षाकरीता रक्कम रु. ४०.२५/- लक्ष मात्रची अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आलेली असून उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी प्रमुख वैद्यकीय अधिकारी, दवाखाना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेनूसार RCH Phase – २ चार वैद्यकीय अधिकारी व एक परिचारीका यांना दि.०१/०१/२०२६ रोजी एक दिवसांचा खंड देऊन दि.०२/०१/२०२६ ते दि. ३१/१२/२०२६ या कालावधीसाठी मागील प्रमाणे एकत्रित मानधन देणेस तसेच पुर्न:नियुक्ती देणेस वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४५** **(महासभा)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र :-३५१** **दिनांक :-१२/१२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./भांडार/१४३/२०२५-२६ दि.११/१२/२०२५
३. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०९/१२/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०९/१२/२०२५ चाअभिप्राय.
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०९/१२/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.०९/१२/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१३ वेळी व्हिडीओ चित्रीकरणेबाबतचे यांचे मुदतबाह्य अदायगीच्या मान्यता मिळणेबाबत.

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्री.सुनिलदत्त व्ही. अकोले यांनी श्री.संजय बाळकृष्ण नेवे प्रो.प्रा. गणेश व्हिडीओ अँड कलर फोटो स्टुडीओ, पत्ता व्हि.एस. वार्ड, सातारा पुलाजवळ बाजार पेठ पोलीस स्टेशन, भुसावळ यांनी जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव सार्वजनिक निवडणूक-२०१३ कामी वेळोवेळी आवश्यक वाटेल त्यावेळेस निवडणूक प्रक्रिया पूर्ण होई पावेतो व्हिडीओ चित्रीकरण करुन त्यांची सी.डी. तयार करणे उर्वरीत देयक रक्कम रु.१६,७४,६६०/- मात्र मिळालेली नसल्याने ते मिळणे कामी दि.२३/०३/२०२५ ची नोटीस अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे. त्यांनी खालील प्रमाणे बिलाची मागणी केलेली आहे.

| अ.क्रं. | बिल क्रं. | बिलाची दिनांक | पुरविलेले कॅमेरे व प्रति कॅमेरा दर दिवसाचा दर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | १३३ | ०४/०९/२०१३ | १९६x१२३५ | २४२०६०.०० |
| २. | १३४ | ०४/०९/२०१३ | २२x१२३५ | २७१७०.०० |
| ३. | १३५ | ०४/०९/२०१३ | ५६x१२३५ | ६९१६०.०० |
| ४. | १३६ | ०४/०९/२०१३ | ४५x१२३५ | ५५५७५.०० |
| ५. | १३७ | ०४/०९/२०१३ | ३७४x१२३५ | ४६१८९०.०० |
| ६. | १३८ | ०४/०९/२०१३ | १२२x१२३५ | १५०६७०.०० |
| ७. | १३९ | ०४/०९/२०१३ | १६x१२३५ | १९७६०.०० |
| ८. | १३१ | ०४/०९/२०१३ | १०८४x१२३५ | १३३८७४०.०० |
| ९. | १४५ | १४/०९/२०१३ | ५६x१२३५ | ६९१६०.०० |
| | | | एकूण रक्कम रुपये :- | २४३४१८५.०० |

सदर बिलापैकी त्यांना खालील प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे.

| बिल क्रं. | रक्कम रु. |
|---|---|
| १३३ | २४२०६०.०० |
| १३६ | ५५५७५.०० |
| १३७ | ४६१८९०.०० |
| एकूण रक्कम रु. | ७५९५२५.०० |

एकूण रक्कम रु.७,५९,५२५/- मात्र गणेश व्हिडीओ अँण्ड कलर फोटो स्टुडीओ यांना अदायगी झालेली आहे. उर्वरीत रक्कम रु.१६,७४,६६०/- मात्रची रक्कम मिळणेबाबत नोटीस दिलेली आहे.

पुरवठादार गणेश व्हिडीओ अॅण्ड कलर फोटो स्टुडीओ, भुसावळ यांना कार्यादेश क्रं.८३ दि.२७/०८/२०१३ नुसार ४३३ मतदान केंद्रा करीता छायाचित्रकार पुरविणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने पुरवठादार यांनी दिलेले देयक क्रं.१४७ प्राप्त नुसार ६६८ कॅमेरे सिडीज चे रक्कम रु.८,२४,९८०/- मात्र चे देयक सादर केलेले आहे. परंतु तत्कालीन भांडारपाल यांनी पुरवठादाराने ३३४ कॅमेरामॅन कॅमेरे सहीत पुरविलेले असून मतदानाच्या दिवशी मतदान प्रक्रिया केंद्र परिसराची शुटींग केलेली असून ३३४ इतक्या सिडीज सादर केलेल्या आहेत व त्या नुसार पुरवठादार यांना त्यांनी दिलेल्या देयक रक्कम रु.८,२४,९८०/- मात्र पैकी रक्कम रु.४,१२,४९०/- मात्र अदायगी करणेबाबत दि.०३/०८/२०१६ चा अहवाल सादर केलेला आहे.

पान क्रं.२९ व तत्कालीन भांडारपाल यांच्या अहवालानुसार रक्कम रु.४,१२,४९०/- मात्र गणेश व्हिडीओ अॅण्ड कलर फोटो स्टुडीओ, भुसावळ यांना महाराष्ट्र लेखा संहिता २०११ चे नियम १६८ नुसार मुदतबाह्य मागणी झाल्याने महासभेच्या मंजुरीने अदा करावी लागेल. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४५** **(महासभा)**

---

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र :-३५२** **दिनांक :-१२/१२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./भांडार/१४४/२०२५-२६ दि.११/१२/२०२५
३. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०९/१२/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०९/१२/२०२५ चाअभिप्राय.
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०९/१२/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.०९/१२/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिके अंतर्गत टोनर रिफीलींग, प्रिंटर दुरुस्ती व इतर साहित्य पुरवठा केल्याने दिपकराज प्रिंटवेल ॲन्ड सप्लायर्स,जळगांव यांचे मुदतबाह्य अदायगीच्या मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव मधील विविध विभागासाठी वार्षीक दर कराराने टोनर रिफीलींग, टोनर ड्रम, प्रिंटर दुरुस्ती व इतर कामे करणेसाठी आयुक्त यांचे दि.२९/०१/२०२१ च्या मंजूरीने कार्यादेश क्रं.२६०/२०२०-२१ दि.२९/०१/२०२१ नुसार कार्यादेश निर्गमीत करणेत आलेले आहे.

त्या अनुषंगाने दिपकराज प्रिंटवेल ॲन्ड सप्लायर्स, जळगांव यांनी विविध विभागांच्या मागणी नुसार खालील दिलेल्या देयकाप्रमाणे कामे केलेले आहे.

| अ.क्रं. | सर्व्हिस रिपोर्ट | बिल क्रं. | दिनांक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | ६०१ ते ७०० | २१०७७ – A | ११/०३/२०२२ | ६७६६०.०० |
| २. | ७०१ ते ८०० | २१०७८ | १४/०३/२०२२ | ६४७४०.०० |
| ३. | १०९१ ते ११०० | २१०८५ | २६/०३/२०२२ | ९७८२५.०० |
| | | | एकूण रक्कम रुपये :- | २३०२२५.०० |

तरी, वरील प्रमाणे पुरवठादार दिपकराज प्रिंटवेल ॲन्ड सप्लायर्स, जळगांव यांनी काम पुर्ण करुन दिले असून त्यानुसार वरील बिले सादर केले असून एकूण रक्कम रु.२,३०,२२५/- मात्रचे देयक अदायगी करणेसाठी पत्रान्वये सादर केलेले आहे.

परंतु, दिपकराज प्रिंटवेल ॲन्ड सप्लायर्स,जळगांव यांना महाराष्ट्र लेखा संहिता २०११ चे नियम १६८ नुसार मुदतबाह्य मागणी झाल्याने महासभेच्या मंजुरीने अदा करावी लागेल. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४५** **(महासभा)**

**विषय क्र.:-०७** **प्रशासक ठराव क्र :-३५३** **दिनांक :-१२/१२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सा.बा./९६७/२०२५ दि.१२/१२/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.१२/१२/२०२५ चा अभिप्राय
४. मनपा,प्रमुख विधी सल्लागार यांचा दि.१२/१२/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१२/१२/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१२/१२/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगाव सि.स.नं.८२९४ या जागेवर वाहनतळ व व्यापारी संकुल विकसित करणे कामी मे. लवादक यांच्या दि.११.१२.२०२५ च्या निवाडयाच्या अनुषंगाने सुधारीत भाडे निश्चितीस, प्रकल्पाचे कामाची सुरुवात करणेस करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगाव सि.स.नं.८२९४ या जागेवर वाहनतळ व व्यापारी संकुल विकसित करणेकामी मे. लवादक श्री. श्रीनिवास पटवर्धन, मुंबई यांचा निवाडा आदेश दि.११.१२.२०२५ च्या निवाडा आदेशान्वये मे. लवादक यांनी निवाडा जाहीर केला आहे. सदर प्रकरणाची पार्श्वभूमी खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

महापालिकेच्या मालकीच्या जळगाव सि.स.नं. ८२९४ या जागेवर व्यापारी संकुल व वाहनतळ चे आरक्षण आहे. सदर आरक्षण विकसित करणेस BOLT तत्वावर जाहीर निविदा मागवून सर्वाधिक मोबदला रक्कम रुपये १,०१,९२,०००/- प्रीमियम व वार्षिक भाडे रुपये ५३,६५,०००/- असा सर्वाधिक देकार देणारे मे, अंगीरा बिल्डकॉन प्रा.लि. यांची निविदा स्थायी समिती ठराव क्रमांक ९६५ दिनांक ३०.०४.२०१२ व महासभा ठराव क्रमांक १३१३ दिनांक २९.०५.२०१२ अन्वये अंतिम करून विकासकाशी दिनांक १६.०६.२०१२ रोजी नोंदणीकृत करारनामा करण्यात आला आहे.

दरम्यान दिनांक १८.०६.२०१२ रोजी अशोक लाडवंजारी यांनी महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ कलम ४५१ अन्वये शासनाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार शासनाने स्थगनादेश दि.२७.०९.२०१२ रोजी प्रकल्पाची जागा हस्तांतरणास दिला. सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाद्वारे दिनांक ०२.०४.१४. रोजी तक्रार निकाली काढतांना पुढील निर्देश देण्यात आले होते. "नियमानुसार व गुणवत्तेवर पुढील कार्यवाही महापालिकेस करता येईल तसेच कामी प्रकल्प राबवतांना महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याची आवश्यक दक्षता घ्यावी" येणे प्रमाणे शासन निर्देश असल्याने या अनुषंगाने महानगरपालिका ठराव क्रमांक १३९ दिनांक २०.१०.२०१४ अन्वये प्रीमियम रुपये १,०१,९२,०००/- ऐवजी रु.६,७७,९६,९९५/- रुपये तसेच ४५ वर्षात एकूण भाडे रू.७२,९८,१०,३८०/- ऐवजी रू.१४३,२५,८३,६३८/- अशी असल्याने व विकासक त्यास तयार नसल्याने करार रद्द करणेचा निर्णय झालेला आहे. त्यावर विकासकाने महापालिके विरुध्द कलम ४५१ अन्वये शासनाकडे ठराव विखंडनाची मागणी केली होती. शासनाने दिनांक ०९.०३.२०१६ अन्वये त्यावर पुढील प्रमाणे निर्देश दिले.

प्रस्तुत प्रकरणी सन २०१२ मध्ये सदर जागेच्या विकासाबाबत केलेल्या ठराव, निविदा प्रक्रिया, करारनामा, महाराष्ट्र महापालिका अधिनियम, निविदा प्रक्रियेबाबतच्या केंद्र शासनाच्या CVC Guidelines. इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, १८७२ व करारनाम्यातील ऑरब्रीट्रेशन ॲड कॉनसिलेशन ॲक्ट, १९९६ मधील तरतुदी या सर्व बाबी विचारात घेऊन सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने आयुक्त, जळगाव महापालिका यांनी कार्यवाही करावी असा शासन निर्णय घेण्यात आला आहे" असे निर्देश दिले आहे. यावर विकासकाने में, उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन लवादक नेमणूक करून वाद सोडवण्यात यावा अशी अट करारात असल्याने लवाद नेमणुकीची मागणी केली होती. सदर मागणी नुसार मे. उच्च न्यायालयाने लवाद नेमणूकीचे आदेश मे. मुंबई उच्च

न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे कडील दावा के. २७७७/२०२० मधील निकाल दिनांक ०९.०८.२०२४नुसार दिलेले होते. सुरवातीस दोन वेळा वेगवेगळ्या दोन लवादक न्यायाधीशांनी वैयक्तिक कारणाने दावा चालवणेस असमर्थता दर्शविलेवर माननीय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिवाणी अर्ज क. २७७७/२०२४, लवाद याचिका क्र.१६/२०१७ मध्ये दिनांक ०९.०८.२०२४ रोजी दिलेल्या आदेशाने तिसरे एकल लवाद म्हणून उच्च न्यायालय, मुंबईचे ॲडव्होकेट श्री. श्रीनिवास सुधीर पटवर्धन, रा. मुंबई याची नेमणूक मे. उच्च न्यायालयाने मनपा व विकासक या दोघांच्या सहमतीने केली होती. प्रस्तुत प्रकरणी या आधी मे, न्यायालयाने नियुक्त केलेले दोन वेगवेगळ्या लवादकासमोर काम झालेले होते. विकासक व महानगरपालिका यांनी लवादका समोर मांडलेल्या कामकाजात परस्पर विरोधात रु.४४.०० कोटी नुकसान भरपाई मिळणेची मागणी केलेली होती. सदर कामी नवीन नियुक्त लवादकांसमोर पहिली सुनावणी दि. ३०.०९.२०२४ रोजी घेणेत आली, तद्नंतर दिनांक १४.०५.२०२५ रोजीच्या सुनावणीवेळी उभयंताची समेट घडवणे शक्य आहे त्या करीता समेटकर्ता नेमणुकीची दोन्ही पक्षकारांच्या मान्यतेने ए. आर. शाह ॲन्ड असोसिएटस चार्टर्ड अकांऊटसचे मालक श्री. अनिलकुमार शाह यांची समेटकर्ता म्हणून नेमणूक केली होती. सदर कार्यवाहीत महानगरपालिका व विकासक यांच्यात वेळोवेळी झालेल्या समक्ष सुनावणी अंती त्यावर समेटकर्ता यांनी दिनांक २०.१०.२०१४ रोजीच्या करार रद्द करणे बाबतच्या ठरावातील नमुद कारणे शासनाचे पत्राचे अनुषंगाने व निविदा प्रक्रिये बाबतचे CVC Guideline, इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, १८७२ नुसार नोंदणीकृत करारनामानुसार नसल्याचे निष्कर्ष काढले. तसेच मनपाचे वतीने सन २०२७ पासून ९२,७०,७२०/- प्रति वर्षी भाडे मागणी करारनामा प्रमाणे करण्यात आली त्यास विकासकाने मान्यता दिली. मे. लवाद न्यायालयाने त्यातील सर्व कायदेशीर निकष तपासून समेटकर्ता यांचा दि.०४.११.२०२५ चा निर्णय अंतिम केला आहे. प्रस्तुत प्रकरणी नगररचना विभागाकडून प्राप्त सदयस्थितीदर्शक मूल्यांकनानुसार २०२५ सालासाठी रु ६६,८२,७३४/- भाडे रक्कम निश्चित येत असल्याचे समेटकर्ता यांचे समोर कार्यवाहीत मांडण्यात आलेले आहे. समेटकर्ता यांच्या अहवाला नुसार मनपाला दर वर्षी रक्कम रुपये ९२,७०,७२०/- भाडे स्वरूपात मिळेल तसेच यात दर ४ वर्षानी २०% भाडेवाढ गृहीत धरता एकूण ४५ वर्षात एकूण भाडे रक्कम रुपये १२६,११,१२,३३८/- एवढे उत्पन्न मनपाला मिळणार आहे.

समेटकर्ता यांचे समोरील कार्यवाहीत समेट झालेले मुददे :

१) विकासकाने सदयस्थितीतील मूल्यांकनानुसार येणाऱ्या भाडे रकमेपेक्षा जास्तीचे भाडे देण्यास स्विकृती दिलेली आहे. सन २०१२ व सन २०२५ मध्ये झालेल्या बांधकाम खर्चातील वाढीचा विचार केल्यास सदरची वाढ नुसार काम करण्यास स्विकृती दिलेली आहे. त्यास महानगरपालिकेने स्विकृती दिलेली आहे.

२) दोनही पक्षांनी ऐकमेकांच्या विरूध्द केलेले नुकसान भरपाईचे सर्व दावे मागे घेतलेले आहे.

बांधकामाचे मुल्यांकन विचारात घेता सन २०१२ मध्ये ग्राह्य धरलेली रेडी रेकनरनुसार बांधकाम खर्चाची गणना प्रति चौ.मी. रु. ७५००/- या आधारावर करण्यात आली होती, तर वर्ष २०२५ मध्ये ती प्रती चौ.मी. रु.२४,१४०/- इतकी येते. बांधकाम खर्चात ३००% पेक्षा अधिक वाढ झाली आहे. वर्ष २०१२ च्या तुलनेत वर्ष २०२५ मध्ये बांधकाम खर्च लक्षणीय रीत्या वाढले असून बांधकाम अद्याप सुरू झालेले नाही. राज्य शासनाच्या निर्देशांचा आणि लवादक कार्यवाहीत महानगरपालिकेच्या हितास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, विकासकाने त्यास विना आक्षेप मान्यता दिली आहे. त्यामुळे बांधकाम खर्च वाढूनही भाड्यात कोणतीही तडजोड केलेली नाही आणि महानगरपालिकेचे हित जोपासण्यात आले आहे.

समेटकासमोर झालेल्या कामकाजामध्ये त्यांनी दिलेल्या निष्कर्षानुसार महानगरपालिके तर्फे विकासकास केवळ खुले भूखंड उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे उभारण्यात येणाऱ्या बांधकामाच्या खर्चाची परीगणना करून त्यातून भविष्यात प्राप्त होणाऱ्या संभाव्य भाडे मूल्याच्या रकमेची परीगणना ही वास्तविक व कायदेशीरदृष्ट्या संभवनीय नाही. कारण सदर बांधकाम सध्या अस्तित्वातच नाही. महानगरपालिका विकासकांना केवळ मोकळी जागा देत आहे. बांधकामाची उभारणी ही विकासकाने स्वतःच्या खर्चाने करावयाची आहे. दिनांक २०.१०.२०१४ च्या ठरावात दर्शविण्यात आलेले अपेक्षित भाडे हे प्रस्तावित बांधकामावर आधारित असून, ते बांधकाम अद्याप विकासकाने केलेले नाही. दिनांक २०.१०.२०१४ च्या ठरावात प्राप्त होवू शकणारी रकमेची परीगणना तयार करण्यात आली. समेटकर्ता यांचा अहवाल (३) नुसार आर्थिक निविदा उघडल्यानंतर आर्थिक बार्बीच्या शर्तीत फेर बदल करता येत नाही या बाबत CVC मार्गदर्शक सुचना व मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचा संदर्भ दिलेला आहे. सोबत समेटकर्ता यांचे समोरील कार्यवाहीचा करार, लवादक यांचा निवाडा, कामकाजाच्या कार्यवाहीच्या प्रती जोडलेल्या आहेत.

त्यानुसार लवादक यांनी दिनांक ११.१२.२०२५ रोजी निवाड्यात दिलेला निर्णय :

१) समेटकर्ता यांचे समोर झालेला दि.०४.११.२०२५ रोजी झालेला समेट महानगरपालिका व विकासक यांना बंधनकारक राहील.

२) विकासक महानगरपालिकेकडे मंजूरीसाठी नवीन बांधकाम नकाशा सादर करेल.

३) महानगरपालिका ०७ दिवसांत नकाशांना मान्यता देईल.

४) बांधकाम नकाशा मंजूरीनंतर महानगरपालिका ०७ दिवसांत कार्यादेश निर्गमित करेल.

त्यानुसार सदर प्रकरणी,

१) समेटकर्ता यांचे समोर झालेल्या कार्यवाही नुसार मे. लवादक याचा निवाडा महानगरपालिका हिताचा असल्याने प्रकल्पाचे काम हाती घेणेस,

२) सदर प्रकरणी समेटकर्ता यांचे समोर झालेल्या आर्थिक पडताळणीच्या कार्यवाहीत बांधकामास सुरुवात करून सन २०२७ मध्ये मिळणारे भाडे रक्कम रू.९२,७०,७२०/- त्या वर्षासाठी निश्चित करून त्यावर पुढील दर ०४ वर्षांनी २० टक्के वाढ याप्रमाणे भाडे आकारणीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ७९ नुसार मान्यता मिळणेस,

३) विकासकासोबत नोंदणीकृत केलेला दि.१६.०६.२०१२ च्या करारातील अटी शर्ती कायम ठेवून त्यात निवाड्यानुसार आवश्यक दुरूस्तीसह पुरवणी करारनामा करून, कार्यादेश निर्गमित करणेस,

प्रस्तुत प्रकरणी, वरील १ ते ३ प्रमाणे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.लवादक यांचा निवाडा, CVC guidelines, महापालिका अधिनियम विचारात घेता उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**